REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# बार्शी शहरातील सूत व कापड उद्योगाची वाटचाल

**प्रा. डॉ. बळीराम हणुमंत जाधव**
**मु. पो. आगळगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर.**

## प्रस्तावना :

कापसाचा उगमच हिंदुस्थानमध्ये झाल्याचे मानले जाते. वृक्षरूपी कापसाचे तंतू कापडनिर्मितीस उपयुक्त ठरतात यावर मुळात पाश्चात्यांचा विश्वासच नव्हता. परंतू ज्यावेळी हे सिध्द झाले तेव्हापासून त्यांनी आपल्या वाड्.मयामध्ये कापसाचे वर्णन व गुणगाण करण्यास सुरूवात केली. प्राचीन काळी गंगा, सिंधू या नदयांच्या खोऱ्यात कापसाची उत्कृष्ट लागवड केली जात होती. पूर्वी हा कापूस इतका सुंदर होता की त्यापासून जी वस्त्रे बनविली जात असत, ती मौल्यवान वस्तूंनी मढवून अधिक आकर्षक व किंमती बनविली जात. ही वस्त्रप्रावरणे परदेशात ' हीरक वस्त्र, मणिचीरा वस्त्र ' अशा रचनात्मक नावांनी राजेरजवाडयास भारतीयांची भेट म्हणून पाठविली जात असत. भारतामध्ये येणाऱ्या परकीय प्रवाशांनी या वस्त्रांना ' भारतीय विणलेली हवा ' असे संबोधले. पूर्वी ज्या हातमागाच्या सहाय्याने वस्त्रनिर्मिती होत होती ती अतिशय मंद होती. पुढे एका कल्पक विणकराने इ. स. १७३३ मध्ये 'धावता धोटा' शोधून काढला.[१]

औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभावस्थेत ' रिचर्ड आर्कराइट ' या उद्योजकाने हौशी संशोधकांना सर्वतोपरी मदत करून सूत कताई यंत्र तयार करून घेतले. यामुळे सूत कताईच्या कामाला कमालीचा वेग आला.[२] पुढे इ. स. १७६४ मध्ये ' जेम्स हरग्रीव्हज ' या कल्पक इंग्रजाने अधिक उत्पादन देणाऱ्या जेनिचा शोध लावला. या जेनिवर एका वेळी एकच सुई वापरली जात असल्याने उत्पादन गतीशील झाले, मात्र ते मुबलक नव्हते. त्यामुळे इ. स. १९७५ मध्ये ' कार्टरीट ' याने वेगवान व जलद उत्पादन देणाऱ्या ' पावर लूम ' चा शोध लावला. इंग्रजांमुळे भारतीयांना या उद्योगाचे महत्व लक्षात आले. यातूनच इ. स. १८५४ मध्ये ' कासवजी दादाभाई दावर ' या पारशी व्यक्तीने ' मुंबई ' येथे भारतातील पहिली कापड गिरणी उभारली. पुढे या उद्योगाने देशात फार मोठे स्वरूप धारण केले. त्यातूनच मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, नागपूर, मद्रास, कानपूर, कोईमतूर अशी अनेक शहरे वस्त्रोद्योगाची प्रमुख केंद्रे बनली.[३] इंग्रजांच्या सान्निध्यामुळे पारशी, भाटीया, मारवाडी, गुजराथी लोक व्यापार-उद्योगात पुढे आले. त्याचा आपोआपच महाराष्ट्राला फायदा झाला. पुढे मुंबईत गिरण्यांची संख्या वाढू लागल्यामुळे दुसऱ्या ठिकाणी गिरण्या स्थापन करण्यास सुरूवात झाली. यातूनच सोलापूर जिल्ह्यामध्ये आधुनिक सूती वस्त्रोद्योगाचे आगमन झाले.[४]

' एक स्पिंडल ' म्हणजे सूत गिरणीचे परिमाण होय. स्पिंडलच्या एकूण संख्येवर गिरणीची कार्यक्षमता समजते. गिरणीच्या सूत निर्मितीच्या प्रक्रियेचे दोन प्रकार मानले जातात. एक म्हणजे केवळ सूत निर्मिती करणारी यंत्रयुक्त सूत गिरणी, तर सूत निर्मितीनंतर कापडही तयार केले जाते त्याला ' कॉपोनंट मिल ' म्हणतात.[५]

पेशवाईच्या काळात सोलापूरातील हातमाग व्यवसायाच्या विकासास चालना मिळाली. पुढे इ. स. १८१८ मध्ये ब्रिटिश सैन्य सोलापूरात घुसल्यानंतर तेथील विणकर मोठ्या प्रमाणात बार्शी तालुक्यातील ' वैराग ' येथे स्थलांतरीत झाले.[६] सूत गिरणी हा सोलापूर जिल्ह्यातील पहिला संघटीत उद्योग होता. याचे प्रमुख केंद्र बार्शी आणि सोलापूर हे होते. सोलापूरमधील कापड गिरण्यासाठी वार्षिक सरासरी ७८४ टन कापूस लागत होता. यापैकी दोन तृतियांश कापूस बार्शीमधून जात होता.[७]

इ. स. १९६३ च्या सुमारास सोलापूर जिल्ह्यामध्ये १२ हजार विणकर होते. तेथे विणकऱ्यांना ' मुंगा ' असे म्हणत. कापड छपाई व रंगकाम हा उद्योग हातमागाच्या व्यवसायाला पूरक व सहाय्यकारक आहे. यामध्येही विणकर समाजच आढळतो. छापाईचा उद्योग ' खत्री ' लोक करतात.[८]



निजामाच्या कापूस उत्पादक प्रदेशासाठी ' बार्शी ' हे मुख्य व्यापारी केंद्र होते. इ. स. १८४० मध्ये निजामाच्या प्रदेशातून ५००० बैलगाड्या इतका कापूस आला. याची किंमत साधारणतः १,२५,००० रू. इतकी होती. जिल्ह्यामध्ये विणकरांची जी संख्या होती त्यामध्ये ' बार्शी ' व ' वैराग ' ही खूप महत्वपूर्ण ठिकाणे होती. येथील बहुतांशी विणकर स्वतंत्रपणे विणायचे तर काही रोजंदारीवर दिवसाला २ ते ६ आणे या दराने विणायचे. बार्शी तालुक्यामध्ये बार्शी, वैराग, तडवळे व पांगरी ही विणकरांची प्रमुख ठिकाणे होती. कापसापासून व लोकरीपासून कपडे तयार करण्याच्या व्यवसायामध्ये हे विणकर गुंतलेले होते. त्यांच्याकडे कापसासाठीचे ३७६ हातमाग तर लोकरीसाठीचे ११७ हातमाग होते. या माध्यमातून बार्शीमध्ये

प्रत्येक आठवड्याला १ लाखापर्यंत तर वैरागमध्ये १४ हजारापर्यंतच्या मालाची उलाढाल होत असे. बार्शीमध्ये कापसाच्या गाठी बनविण्याचे दोन कारखाने होते. यापैकी एक कारखाना इ. स. १८६६ मध्ये ईस्ट इंडिया प्रेस कंपनी यांनी सुरू केला होता तर दुसरा कारखाना इ. स. १८७६ मध्ये डब्ल्यू. ए. ग्रॅहम आणि कंपनी यांनी सुरू केला होता. कापसाच्या हंगामामध्ये या कंपन्या येथील कामगारांना दिवसाला ८ ते १२ आणे पगार देत. या कारखान्यांमध्ये काम करणारे बहुसंख्य लोक मराठा व मुस्लिम होते. येथील कारखान्यामध्ये तयार झालेल्या कापसाच्या गाठी मुंबईला पाठविल्या जायच्या.[९]

इ. स. १८७० पर्यंत कापसाची मुख्य बाजारपेठ सोलापूर होती. पुढे इ. स. १८७० नंतर ' बार्शी ' ही कापसाची मुख्य बाजारपेठ बनली. कारण सोलापूरमधील व्यापाऱ्यांनी कापसाच्या प्रत्येक बंडलमागे विशिष्ट प्रमाणामध्ये जकात घेण्यास सुरूवात केली. त्यामुळे निजामाच्या प्रदेशातील व्यापाऱ्यांनी बार्शी हे आपले कापसाचे मुख्य केंद्र बनविले. त्यामुळे निजामाच्या प्रदेशातील व्यापाऱ्यांनी सोलापूरकडे दुर्लक्ष करून बार्शीला कापसाचे मुख्य केंद्र बनविल्याने सोलापूरमधील कापसाच्या गाठी बनविण्याचे कारखाने बार्शीला आले. त्यामुळे मुंबईचे व्यापारीही बार्शीला येऊ लागले. स्थानिक लिंगायत, कोमटी, गुजर मारवाडी व मुंबई येथील भाटिया हे कापसाचे प्रमुख व्यापारी होते. बार्शीमध्ये येणारा कापूस प्रामुख्याने दिगनोर, दिसमत, खामदाबाद, किरकोली, मदनूर, माकीर, नांदेड, पार्ली आणि उनवीर या निजामाच्या प्रदेशातून येत असे. बार्शीमध्ये कापसाची खरेदी-विक्री दोन प्रकारे होत असे. एकतर स्थानिक व्यापारी किंवा शेतकरी हा अडत्याच्या माध्यमातून आपला कापूस बाजारामध्ये विकत असे. अथवा मुंबई किंवा बार्शीचे व्यापारी किंवा त्यांचे एजंट कापूस खरेदीसाठी दिवाळीनंतर निजामाच्या कापूस उत्पादन घेणाऱ्या प्रदेशाचा दौरा करत असत. बार्शीमध्ये साळी लोक या कापड व्यवसायात मोठ्या प्रमाणात होते. ते कापड विणण्याचा व्यावसाय करत. निजामाच्या प्रदेशातून बार्शीमध्ये येणाऱ्या कापसाची वार्षिक उलाढाल ३६ लाख रूपये इतकी होती. इ. स. १९०३ मध्ये बार्शी तालुक्यामध्ये जिनिंग आणि प्रेसिंगचे ६ कारखाने होते. यामध्ये ४७३ कामगार काम करत होते. इ. स. १९११ मध्ये या कारखान्यांची संख्या ५ इतकी झाली, तर कामगारांची संख्या ३६० इतकी झाली. पुढे इ. स. १९२१ मध्ये या कारखान्यांची संख्या १३ इतकी झाली. थोडक्यात सातत्याने ही संख्या वाढत होती.[१०]

संपूर्ण मराठवाड्यातील शेतमाल विक्रीसाठी बार्शीला मोठ्या प्रमाणावर येत असे. यामध्ये कापसाचे प्रमाण उल्लेखनीय होते. त्यामुळेच येथे कापूस उद्योगाची बीजे पेरली गेली. यातूनच बार्शीमध्ये सुलाखे, काडादी, गोकूळदास कल्याणजी, कवठेकर, भरतपुरे, गमाडीया, माने, कोठारी, मेंडके, मुलजी जेठा, नारळी अशा बारा जिनिंग मिल सुरू झाल्या. या समृध्द पार्श्वभूमीने बार्शी तालुक्यामध्ये सूत गिरण्या उभारणीस चालना दिली.[११]

इ. स. १९२१ पर्यंत बार्शीमध्ये एक सूत गिरणी प्रत्यक्ष चालू होती. या सूत गिरणीमध्ये १२२३ एवढे कामगार काम करत होते. इ. स. १९७७ अखेर तीन कापड गिरण्या झाल्या. सोलापूर येथील कापड गिरण्यांना लागणरे मध्यम व जाडेभरडे सूत बार्शी येथून पाठविले जायचे. इ. स. १९२८ मध्ये बार्शी येथे लोकमान्य सूत गिरणी व जय शंकर सूत गिरणीतून प्रत्यक्ष उत्पादन सुरु झाले.[१२] इ. स. १९४६ च्या मुंबई कायदयान्वये सोलापूर जिल्ह्यामध्ये ४ कामगार संघटनांची नोंद झाली. यामध्ये बार्शीच्या " राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचा " समावेश होता. मुंबई कामगार कल्याण कायदा १९५३ अन्वये अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्राचे एक कार्यालय बार्शी येथे आहे.[१३]

## ➢ लोकमान्य सूत गिरणी

२१ डिसेंबर १९२२ रोजी ' लोकमान्य कापड गिरणी ' ची स्थापना झाली. ही मिल लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने सुरू केल्यामुळे या मिलचे संस्थापक ' श्री. काकासाहेब सुलाखे ' यांनी या मिलला टिळकांचेच नाव दिले. श्री. काकासाहेब सुलाखे यांनी शेअर्सद्वारे या मिलसाठीचे भांडवल गोळा केले होते. या मिलचे सुरूवातीचे एकूण भांडवल ५० लाख रूपये एवढे होते.

इ. स. १९२२ मध्ये ही मिल स्थापन झाली असली तरी प्रत्यक्ष सूत निर्मितीची सुरूवात ६ डिसेंबर १९२८ रोजी झाली. या मिलमध्ये १ नंबर पासून ते ३२ नंबर पर्यंतचे सूताचे उत्पादन घेतले जात होते.[१४] सूताची जाडी व लांबी यांचा मेळ बसविण्यासाठी सूताला नंबर दिले जातात. १ हजार मीटर लांब व १ किलोग्रॅम वजन असणाऱ्या सूताला १ नंबर दिला जातो. याशिवाय सूताला नंबर देण्याच्या इतर पध्दती आहेत, मात्र ही सर्वात सोपी पध्दत आहे.[१५] लोकमान्य मिलमध्ये १२,८७२ हातमाग व १००० पेक्षा जास्त कामगार होते. ही सूत कातन्याची मिल होती.[१६]

इ. स. १९४९ मध्ये या मिलला १,६४,९६५ रूपयांचा तोटा झाला. कारण जुलै १९४८ मध्ये मुंबई सरकारने सूत गिरण्यांवर अनेक निर्बंध घातले. तसेच या काळामध्ये कापसाचे दर व मजूरी वाढली. इ. स. १९४९ मधील तोटयामुळे ४ जानेवारी १९४९ रोजी ही मिल बंद करण्यात आली. या संकटातून मार्ग काढण्यासाठी या मिलच्या मालकांनी इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन दिल्ली यांचेकडून ८ लाख रूपयांचे कर्ज घेतले. त्यामुळे पुन्हा ४ जानेवारी १९५० रोजी ही मिल चालू झाली. तरीही इ. स. १९५० मध्ये या मिलला २,४४,७८१ रूपयांचा तोटा झाला. इ. स. १९५२ मध्ये पहिल्या सहा महिण्यांमध्ये सूत बाजारात मंदी असल्याने व सूताचे भाव अस्थिर असल्याने पुन्हा मिल तोटयात गेली. इ. स. १९४९ व १९५० मध्ये झालेल्या तोट्याची भरपाई इ. स. १९५२ मध्ये करावी लागली.

इ. स. १९५३ मध्येही मिलला तोटा झाला, कारण या वर्षात जुलै महिन्यामध्ये सूतावरील नियंत्रण उठविण्यात आले. त्यामुळे लहान गिरण्यांना खुल्या बाजारात मोठ्या गिरण्यांशी स्पर्धा करावी लागली. सूताचे नियंत्रित दरही लहान गिरण्यांना परवडणारे नव्हते. त्यामुळे नियंत्रण उठविल्यानंतर सूताचे भाव खूपच उतरले. यामुळे हा तोटा सहन करावा लागला.[१७]

कामगार वर्गाच्या हितासाठी १७ मे १९३८ रोजी लोकमान्य मिलहँडस् को-ऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन झाली. यामागे लोकमान्य मिलचे मॅनेजर श्री. सुलाखे. भ. प, श्री. क्षिरसागर, श्री. दिवाकर, श्री. शुक्ला यांनी पुढाकार घेतला. सभासदांना भागाच्या रकमेइतकेच कर्ज वैयक्तिक जबाबदारीवर दिले जात असे. या सोसायटीने प्रारंभी केवळ कर्जव्यवहारच केले. पुढे इ. स. १९४१-४२ मध्ये किराणा-भुसार मालाचे दुकान चालू केले. या दुकानासाठी ज्वारी खरेदी करण्यास लोकमान्य मिलने ३०,००० रूपये भांडवल म्हणून बिनव्याजी दिले. युध्दजन्य परिस्थितीमुळे ज्वारीचे भाव उतरले होते. त्यावेळी या सोसायटीने एकदम भरपूर धान्य खरेदी केले. त्यामुळे सोसायटीच्या सभासदांना कमी दराने धान्य मिळू शकले. याच वर्षापासून या सोसायटीने कामगारांसाठी कापडाचे दुकान चालविले. सभासदांच्या मनोरंजनासाठी व शारीरिक उन्नतीसाठी २६ मार्च १९५२ रोजी " मिल कामगार संस्कार केंद्र " स्थापन केले. स्वतःचे एक वाचनालय सुरू केले. वेगवेगळे सण-उत्सव साजरे केले जात. कामगारांच्या आरोग्याकडेही या सोसायटीने चांगले लक्ष दिले होते. या सर्व कार्यामध्ये ही मिल या सोसायटीच्या पाठीमागे खंबीरपणे उभी होती. कुशल कामगार तयार व्हावेत या दृष्टीने मिलने टेक्निकल स्कूल चालविले.[१८]

इ. स. १९५२ मध्ये सरकारने कामगारांसाठी केलेले विविध कायदे या मिलने कामगारांना लागू केले. यासाठी मिलला शासनाकडे जादा रक्कम भरावी लागली. इ. स. १९२२ ते १९५९ या काळामध्ये ही मिल अनेक संकटावर मात करून उभी होती. यामध्ये श्री. पंढरीनाथ सुलाखे यांचे बहुमोल योगदान होते. इ. स. १९५७ ते १९५९ या काळामध्ये या मिलला तोटा झाला. कारण या काळात सूताला योग्य भाव मिळाले नाहीत. शिवाय इ. स. १९५८ मध्ये फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान मिल बंद होती, तर मे व जून मध्ये ती पूर्णवेळ चालू नव्हती. अशातच कामगारांनी पगारवाढ, महागाई भत्ता, बोनस मिळावा म्हणून मे. इंडस्ट्रियल कोर्ट मुंबई यांच्याकडे अर्ज केला. कोर्टाच्या निकालाप्रमाणे या मिलला कामगारांना रोज १ रूपये ६५ पैसे या प्रमाणे महागाई भत्ता द्यावा लागला. त्यामुळे ही मिल अधिकच तोट्यात गेली.[१९]

भगवंत पंढरीनाथ सुलाखे यांच्या पुढील वारसांनी या मिलच्या व्यवस्थापनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. या ठिकाणचा पैसा दुसरीकडे गुंतविण्याच्या वृत्तीमुळे संबंधित मालकांनी या मिलच्या सुधारणेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. यातच कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी संप केला. त्यामुळे मिलच्या मालकाला मिल बंद करण्याची आयती संधीच मिळाली. मिलच्या मालकांना त्यांच्या मागण्या मान्य करण्याऐवजी मिलच बंद केली. या मिलच्या मालकाचे तसेच मिलमधील कामगारांचे कपडे शिवण्याचे काम श्री. भगवान उध्दव लांडे यांच्याकडे होते. सध्या या मिलचे वारस बार्शीमध्ये नसतात.[२०]

### ➢ जय शंकर सूत गिरणी (बार्शी टेक्सटाईल मिल)

बार्शी तालुक्यामध्ये कार्यरत असलेली ही एकमेव सूत गिरणी आहे. पूर्वी बार्शीमध्ये कापसाबरोबरच किराणा मालाचा मोठा व्यापार चालू होता. श्री. रामलिंगाप्पा सिद्रामाप्पा झाडबुके हे बार्शीतील एक फार मोठे किराणा दुकानदार होते. त्यावेळी बार्शीचे प्रसिध्द वकील गोविंद कृष्णात टिळक (तात्यासाहेब टिळक) औंधकर सभाग्रहामध्ये दर आठवडयाला व्याख्यान देत. यामध्ये श्री. रामलिंगाप्पा झाडबुके उत्साहाने भाग घेत. यातूनच तात्यासाहेब टिळक यांच्या प्रेरणेने बार्शीमध्ये एक सूत व कापड गिरणी काढण्याचा श्री. रामलिंगाप्पा झाडबुके यांनी ध्यास घेतला.

इ. स. १९११ मध्ये त्यांनी गिरणी काढण्यासाठी शेअर्स गोळा केले. मात्र त्यांना त्यावर्षी गिरणी स्थापन करता आली नाही. असे घडले तरी त्यांनी आपला मनोदय बदलला नाही. यातूनच पुढे २ नोव्हेंबर १९२२ रोजी " दि जयशंकर मिल्स लिमिटेड बार्शी " ही सूत गिरणी स्थापन झाली. त्यावेळी या मिलचे भांडवल २० लाख रूपये इतके होते. इ. स. १९३० मध्ये श्री. रामलिंगाप्पा झाडबुके यांचे निधन झाल्यानंतर श्रीयुत रामलिंग सिद्रामप्पा झाडबुके हे मिलचे एकमेव संस्थापक मालक होते. पुढे त्यांचे चिरंजीव गणपत झाडबुके यांच्या हातात या मिलची सुत्रे आली.[२१]

जय शंकर मिलच्या स्थापनेसाठी स्वामी परंडकर यांनीही खूप प्रयत्न केले. विदर्भापर्यंत प्रवास करून या मिलसाठी त्यांनी वीरशैव समाजाकडून हजारो रूपये जमा केले. वीरशैव समाजानेही त्याला प्रचंड प्रतिसाद दिला. वीरशैव समाजाच्या मालकीची एक सूत गिरणी व्हावी व त्यामार्फत वीरशैव समाजाचा आर्थिक विकास व्हावा असा परंडकरांचा हेतू होता. छत्रपती शिवरायांनी ' हर हर महादेव ' या गर्जनेने आपल्या कार्याची सुरूवात केली होती. त्याप्रमाणे स्वामी परंडकर व त्यांच्या सहकाऱ्यांची ' जय शंकर ' ही गर्जना होती. म्हणून या मिलचे नाव ' जय शंकर ' असे ठेवण्यात आले.[२२] इ. स. १९२८ मध्ये ही ' जय शंकर ' सूत गिरणी सुरू झाली. त्यावेळी या मिलमध्ये १४,५२० हातमाग होते, तर ८०० पेक्षा अधिक कामगार होते. ही सूत कातन्याची मिल होती.[२३]

या मिलचे मालक श्री. गणपत रामलिंग झाडबुके यांना इ. स. १९४२ मध्ये इंग्रजांनी ' रावबहादूर ' ही पदवी दिली. हा झाडबुक्यांच्या वैभवाचा काळ मानला जातो. श्री. गणपत रामलिंग झाडबुके यांच्या मृत्यूनंतर श्री. शंकरराव ऊर्फ भाऊसाहेब झाडबुके हे या मिलचे मालक झाले. ते पुढे बार्शीचे नगराध्यक्ष झाले. त्यांना राजकारणात खूप रस होता. त्यामुळे त्यांचे मिलकडे दुर्लक्ष झाले. त्यांच्याच काळात मिलचे दिवाळे निघाले. पुढे इ. स. १९७२ मध्ये भारत सरकारने या मिलचा ताबा घेतला.[२४]

२ जून १९७० रोजी केंद्र शासनाने जय शंकर मिल साठी एका चौकशी समितीची नियुक्ती केली होती. या समितीने १६ जुलै १९७१ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला. या अहवालाच्या माध्यमातून या समितीने "उद्योग अधिनियम १९५१" च्या १८ 'अ' या कलमान्वये शासनाने ही गिरणी चालविण्यास घ्यावी अशी शिफारस केली. या अहवालाचा विचार करून केंद्र सरकारने ही गिरणी चालविण्यास घ्यावी असा राज्य शासनाने आग्रह धरला. १७ सप्टेंबर १९७१ रोजी राज्य शासनाने केंद्र सरकारला असे सूचित केले की, " ही गिरणी चालू न

केल्यास ५०० पेक्षा अधिक कामगारांवर बेकारीचे संकट ओढवेल. त्यामुळे केंद्र शासनाने ही गिरणी चालविण्यास घ्यावी. शिवाय राज्य सरकार केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या शिफारसीशी सहमत आहे." यावेळी विधानसभा आश्वासन समितीवर बार्शीच्या तत्कालीन आमदार श्रीमती शैलजाताई शितोळे या होत्या. त्यांनीच हा प्रश्न उचलून धरला होता.

६ जानेवारी १९७२ रोजी केंद्र शासनाने राज्य सरकारला असे कळविले की " गिरणीला लागणाऱ्या आर्थिक सहाय्यापैकी ४९ टक्के सहाय्य देण्यास व राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ या गिरणीस जे कर्ज देईल त्यासाठी तारण म्हणून गिरणीच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर बोजा निर्माण करण्यास राज्य शासन तयार असेल तर ही गिरणी केंद्र सरकार चालविण्यासाठी विचार करेल." अशा आशयाचे पत्र केंद्र सरकारने ५ जानेवारी १९७२ रोजी राज्य सरकारला पाठविले. केंद्र सरकारच्या या पत्रावर राज्य शासनाने निर्णय घेण्यापूर्वीच ३० ऑक्टोबर १९७२ पासून या गिरणीचे व्यवस्थापन केंद्र शासनाने " सिक टेक्सटाईल अंडरटेकिंगज् इ .स. १९७२ " (टेकिंग ओव्हर ऑफ मॅनेजमेंट) या कायदयान्वये ताब्यात घेतले. त्यामुळे राज्य सरकारला केंद्र शासनाच्या ५ जानेवारी १९७२ रोजीच्या पत्रावर निर्णय घेण्याची आवश्यकताच राहिली नाही. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये तत्कालीन मंत्री श्री. न. म. तिडके यांनी मोलाची भूमिका पार पाडली. मात्र मिलमधील कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या थकबाकी वसूलीसंदर्भातील प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेतून मार्गी लागला.[२५]

प्रतिवर्षाप्रमाणेच बार्शी टेक्सटाईल मिलने ५ मार्च ते ९ मार्च १९९० या कालावधीमध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिवस व सप्ताह मोठ्या उत्साहाने राबविला. केंद्रीय श्रमिक संस्थेकडून मागविलेल्या विविध सुरक्षा साधनांचे प्रदर्शन भरविले होते. वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने राबविण्यात आला. प्रदर्शनामध्ये मिलच्या आतील भागांच्या प्रभावी सुरक्षिततेच्या साधनांचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय मिल मजूर संघाचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ नाईक व महाप्रबंधक ए. के. टंडन यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी श्री. हरिभाऊ नाईक यांनी या मिलच्या चांगल्या कार्यासाठी मिलचे कौतुक केले. यासाठीच्या कामगार व मिल व्यवस्थापन यांच्या सुसंबंधाचा आवर्जून उल्लेख केला.[२६]

" दि जय शंकर मिल एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह सोसायटी " ही जय शंकर मिलमधील कामगारांची सोसायटी आहे. या मिलमधील कामगारांना पूर्वी पगाराचे प्रमाण फार कमी होते. त्यामुळे त्यांना लागणाऱ्या पैशाची सोय सावकार व विशेषत: पठाण यांच्याकडून मोठ्या व्याज दराने होत. पगाराच्या दिवशी मिलच्या दारातच वसुली करण्याचा प्रघात होता. त्यामुळे बहुतेक कामगारांकडे पैसाच शिल्लक राहत नसे. यातून मार्ग काढण्यासाठी मिलचे मॅनेजर श्री. कोरे व ऑफिस मॅनेजर श्री. पळनिटकर यांनी पुढाकार घेऊन १६ ऑक्टोबर १९३४ रोजी ही सोसायटी स्थापन केली. या सोसायटीने शेअर्स देखील हप्त्याने गोळा केले होते. या माध्यमातून कामगारांचे हित जोपासण्याचा मिल कडून प्रयत्न केला गेला. कामगार सोसायट्यांमधील ही एक आदर्श सोसायटी आहे.[२७]

या सोसायटीला नेहमीच परिक्षणामध्ये 'अ' वर्ग मिळत असे. इ. स. १९९० अखेर या सोसायटीच्या सभासदांची संख्या ५०० इतकी होती. इ. स. १९९० पर्यंत या सोसायटीने कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले नव्हते. वेगवेगळया माध्यमातून आपल्या सभासदांना या सोसायटीने १३ लाख रूपयांची मदत केली होती. नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशन दिल्ली यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशनचा उत्कृष्ट मिलचा पुरस्कार इ. स. १९८८-८९ मध्ये या मिलला मिळाला. महाराष्ट्रातील राष्ट्रीयीकरण झालेल्या मिलमध्ये या मिलचा राज्यात प्रथम क्रमांक होता, तर देशात तिसरा क्रमांक होता.[२८]

" बार्शी टेक्सटाईल मिल " चा एकूण परिसर २८ एकर इतका आहे. शिवाय या मिलची ५० एकर खुली जागा आहे. या ठिकाणी सूताच्या गाठी बनविल्या जातात. साधारणतः प्रत्येक महिन्याला १ ते १.५ लाख किलो सूत निर्मिती केली जाते. या मिलमध्ये एकूण ५१८ कामगार कार्यरत आहेत. यापैकी २५२ कामगार कायम असून, २६६ कामगार कंत्राटी स्वरूपामध्ये कामावर आहेत. कायम कामगारांना दिवसाला २७५ ते ३७५ रूपये वेतन मिळते. तर कंत्राटी कामगारांना १९५ ते २४० रूपये वेतन मिळते. कामगारांचे कामाचे ८ तास आहेत. डी. के. शर्मा यांच्या काळात १२५ कामगारांना कायम करण्यात आले. दुसऱ्या शिप्टमध्ये महिला कामगार कामावर आल्यास त्यांना मिलच्या गाडीतून घरपोच केले जाते. कामगारांच्या नियमित उपस्थितीसाठी ही मिल बक्षिस योजना राबविते. महिन्याचे वर्किंग दिवस पूर्ण करणाऱ्या कामगाराला रोज ३० रूपये याप्रमाणे बक्षिस मिळते. वर्किंग दिवसांपेक्षा एक दिवस कमी भरला तर प्रत्येक दिवसाला २० रूपये, तर २ दिवस कमी भरले तर प्रत्येक दिवसाला १० रूपये बक्षिस म्हणून मिळतात. या मिलसाठी प्रामुख्याने मराठवाडा, पंजाब व विदर्भ येथून कच्चा माल येतो तर तयार होणारा माल इचलकरंजी, मालेगाव, बऱ्हानपूर, मध्य प्रदेश, कर्नाटक येथे निर्यात होतो. या मिलमध्ये २० काऊंट कॉटन ते ७४ काऊंट पॉलिस्टर पर्यंतचे सूत बनते.[२९]

हँडलूम्स, पावरलूम्स, तुरूंग व पुनर्वसन-सरकारी उत्पादन विभागांना तसेच औद्योगिक घटकांना आवश्यक असणाऱ्या काऊंट नंबर ३ ते ४० पर्यंतच्या हँक आणि कोनवर एकेरी, दुहेरी तसेच दर्जेदार सूतांच्या धाग्याचे उत्पादन या बार्शी टेक्सटाईल्स मिल मध्ये मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.[३०]

इ. स. २००४-०५ पूर्वी या मिलचा माल चीन मध्ये निर्यात होत होता. या मिलचा वार्षिक खर्च १५ कोटी रूपये इतका आहे. मिलची कार्यशक्ती उत्तम असल्यामुळेच ही मिल टिकून आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे या मिलकडे खूप लक्ष आहे. सध्या ' ना नफा ना तोटा ' या तत्वावर ही मिल चालविली जाते. असे असले तरी इ. स. १९८५-८६ मध्ये या मिलचा वार्षिक नफा २ कोटी रूपये इतका होता. प्रदुषण टाळण्यासाठी या मिलने परिसरात सर्वत्र झाडे व बागा लावल्या, तसेच प्रदूषण टाळण्याचे आधुनिक उपायही योजिले आहेत. या मिलची यंत्रसामग्री खूप जुनी असल्यामुळे त्याचा मिलच्या उत्पादनावर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे या मिलमध्ये नविन आधुनिक यंत्रसामग्री

बसविण्याची एक योजना आहे. यासाठी ६८ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. या मिलने व्यवसायाबरोबर आपले सामाजिक बांधिलकीही जोपासण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. वेळोवेळी भूकंपग्रस्त, पूरग्रस्त तसेच दुष्काळ या प्रसंगी या मिलने मदत केली. शिवाय दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारावर भरपूर पैसे खर्च करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम या मिलने अविरतपणे केले आहे. या मिलने पैलवानांना सांभाळून कुस्ती या खेळास विशेष प्रोत्साहन दिले आहे. याशिवाय इतरही खेळांना प्रोत्साहन देण्याचे काम या मिलने सातत्याने केले.[३१]

## ➢ स्पिनिंग आणि विव्हिंग मिल, बार्शी (राजन कापड व सूत गिरणी)

इ. स. १९११ मध्ये गुजरातचे प्रसिध्द शेठ ' विद्युत प्रसाद देसाई ' यांनी बार्शी येथे " स्पिनिंग आणि विव्हिंग मिल " स्थापन केली. ही बार्शीमधील पहिली कापड व सूत गिरणी होती. या मिलच्या मालकीमध्ये ' श्री. जंबुआण्णा बाबाजी आरवडे ' हे विद्युत प्रसाद देसाई यांचे प्रमुख भागिदार होते. या मिलमध्ये ' धोतर ' व ' मदरा ' नावाच्या कापडाची निर्मिती होत असे. मदरा हे कापड परदेशात निर्यात केले जात होते.[३२]

ही मिल १२ - १२ तासाच्या दोन भागामध्ये चालत असे. त्यावेळी कामगारांना ३ ते ५ रूपयांपर्यंत पगार मिळत असे. तर अधिकाऱ्यांना १०० रूपयांपर्यंत पगार होता. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये या मिलच्या कामगारांनी कोणताही संप केला नाही. मिलचे प्रमुख मालक श्री. विद्युत प्रसाद देसाई यांनी मिलच्या आवश्यक त्या बाबीकडे दुर्लक्ष केले. मिलच्या मोठ्या पदावर गुणवत्ता नसतानाही आपले जवळचे नातेवाईक ठेवले. त्यांनी या मिलचे दिवाळे काढले. शेवटी मिलच्या गैरकारभाराला कंटाळून देसाई यांनी या मिलचे भागिदार श्री. श्री. जंबुआण्णा बाबाजी आरवडे यांना सदर मिलचा ताबा दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या मिलमधील कामगारांनी पगारवाढीसाठी संप करण्यास सुरूवात केली. याला प्रत्युत्तर म्हणून मिलच्या मालकांनी मिलचे दिवाळे काढले.

इ. स. १९५५ मध्ये ' नानाजीभाई मदवाणी ' यांनी ही मिल चालविण्यास घेतली. यावेळी त्यांनी या मिलचे पूर्वीचे नाव बदलून " दि राजन टेक्सटाईल मिल प्रा. लि. बार्शी " असे नामकरण केले. ' श्री. कांतीभाई मदवाणी ' हे मूळचे बडोद्याचे होते. त्यांच्या आफ्रिकेमध्ये शुगर मिल होत्या. मदवाणी हे खूप धनाढ्य व्यक्ती होते. या मिलमधील कामगारांचे कपडे शिवण्याचं काम श्री. भगवान उध्दव लांडे यांच्याकडे होते. तसेच मदवाणी हे देखील श्री. लांडे यांच्याकडूनच कपडे शिवून घेत होते. श्री. मदवाणी व श्री. लांडे यांचे खूप सलोख्याचे संबंध होते. त्यावेळी त्यांच्याकडे इंपाला गाडी होती. सोलापूर जिल्ह्यामध्ये केवळ त्यांच्याकडेच ही गाडी होती.[३३]

इ. स. १९५८ मध्ये ही मिल पुन्हा बंद पडली. मिलचालकाच्या दिवाळखोर धोरणामुळे अनेक कामगार बेकार झाले. मधवाणी परिवाराला ही मिल व्यवस्थित चालविता आली नाही. शेवटी इ. स. १९७९ मध्ये मदवाणी यांनी ही मिल मुंबईच्या ' श्री. बि. ही. पारसे ' यांच्या ताब्यात दिली. त्यांनीही इ. स. १९८४ मध्ये या मिलचे दिवाळे काढले. विस्कळीत व्यवस्थापन, मालकाचे दुर्लक्ष, कामगारांच्या विविध कारणामुळे होणाऱ्या असहकारातून ही मिल बंद पडली. इ. स. २००० नंतर ही मिल बार्शीचे माजी नगराध्यक्ष ' श्री. विश्वासराव बारबोले ' यांनी विकत घेतली.[३४]

## ● निष्कर्ष :

बार्शी तालुक्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाचे योगदान असलेल्या सूत उद्योगाला नंतरच्या काळात घरघर लागल्याचे दिसून येते. मिलमधील जुनी यंत्रसामुग्री तसेच कामगारांची काम न करण्याची प्रवृत्ती, राजकारण, शासनाचे धोरण अशा विविध कारणातून तालुक्यातील तीनपैकी दोन मिल बंद पडल्या. तर एक राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या अधिपत्त्याखाली गेली. परंतू बंद पडलेल्या मिलमुळे तालुक्यातील हजारो कामगार बेकार झाले. यातील बहुसंख्य कामगार मुंबई, मालेगाव, इचलकरंजी, बडोदा येथे स्थलांतरीत झाले. या उद्योगाला पूरक असणारे उद्योगधंदे झपाट्याने कमी झाले. या कामगारांची खूप परवड झाली. बेकारीची संख्या वाढल्यामुळे मजूरीचे दर झपाट्याने कमी झाले. अनेक कामगार व्यसनाच्या अहारी गेले. कामगारांच्या दारीद्रयाला सीमा राहीली नाही. यातून अनेक कुटुंबे विस्कळीत झाली. तालुक्यातील कापूस लागवडीवर याचे विपरित परिणाम झाले. सूत उद्योगातून तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर होणारी उलाढाल ठप्प झाल्यामुळे तालुक्याचा आर्थिक विकास मंदावल्याचे चित्र दिसते. तालुक्यामध्ये या उद्योगाच्या माध्यमातून बाहेरून येणारा पैसा खूप कमी झाला.

## संदर्भ साधने


**१)** देवधर. न. गो, सुती वस्त्रोद्योग, इ. स. १९७५, पृ. ६, ७, ९.

**२)** उद्योजक मासिक, जून २०१२, पृ. २३, २४.

**३)** देवधर. न. गो, पूर्वोक्त, पृ. १०.

**४)** वैद्य चिं. न, औद्योगिक विकास, जोशी व लोखंडे प्रकाशान पुणे, पृ. १८, १९.

**५)** देवधर न. गो, पूर्वोक्त, पृ. ४४, ४६.

**६)** महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ४००.

**७)** गॅझेटीयरऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, पृ. २६४, २६५.
**८)** देशपांडे कृ. भा, औद्योगिक सहकार दर्शन, २२ फेब्रुवारी १९६३, पृ. ९, १०, १२.
**९)** गॅझेटीयरऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, पृ. २७०, २७१, ३५१, ४१०.
**१०)** महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ३८८, ३८९, ४८१ ते ४८३.
**११)** मुलाखत, देवधरे सुभाष श्रेणिक, बार्शी.
**१२)** महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ३८२ ते ३८४, ३८६.
**१३)** कित्ता, पृ. ४१८, ८१८.
**१४)** मुलाखत, श्री. दिनुभाऊ सुलाखे, कापडाचे प्रसिध्द व्यापारी बार्शी.
**१५)** देवधर. न. गो., पूर्वोक्त, पृ. ४०.
**१६)** सोलापूर जिल्हयाची जणगणना, सन १९६१, पृ. ५०.
**१७)** लोकमान्य सूत गिरणी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५.
**१८)** काळे. गो. र., बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक व बार्शी तालुक्यातील सहकारी पतपेढयांचा इतिहास, पृ. १२२, १२३.
**१९)** लोकमान्य सूत गिरणी, वार्षिक अहवाल, इ. स. १९६०.
**२०)** मुलाखत, श्री. भगवान उध्दव लांडे, बार्शीमधील प्रसिध्द शिंपी, ३ मे २०१०.
**२१)** मुलाखत, देवधरे सुभाष श्रेणिक, बार्शी.
**२२)** प्रा. डॉ. स्वामी. भि. शि, सद्‌गुरूदर्शन-हिरक महोत्सव गौरव ग्रंथ, इ. स. २००५, पृ. ९०.
**२३)** भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ. ५०.
**२४)** मुलाखत, रामभाऊ बेणे, भाऊसाहेब झाडबुके यांचे वाहन चालक, बार्शी.
**२५)** विधानसभा आश्वासन समिती, इ. स. १९७२, पृ. ७, २९६, २९७,३७७.
**२६)** भाव परिधान त्रैमासिक, अंक ९, एप्रिल-जून १९९०.
**२७)** काळे. गो. र., पूर्वोक्त, पृ. १२१, १२२.
**२८)** भाव परिधान त्रैमासिक, अंक ९, एप्रिल-जून १९९०.
**२९)** प्रश्नावली व कामगार नोंद रजिस्टरच्या माध्यमातून मिळालेली माहिती.
**३०)** बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.
**३१)** प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळालेली माहिती.
**३२)** मुलाखत, बाबासाहेब उध्वराव मनगिरे, माजी नगराध्यक्ष, बार्शी.
**३३)** मुलाखत, श्री. भगवान उध्दव लांडे, बार्शीमधील प्रसिध्द शिंपी.
**३४)** मुलाखत, विश्वास बारबोले, माजी नगराध्यक्ष, बार्शी.